गुहागर तालुक्याचे मुखपत्र साप्ताहिक

# गुहागर टाइम्स

E-mail:Guhagartimes@gmail.com सत्याची धार... अन्यायावर प्रहार

MAH-02148/09 वर्ष १३, अंक ३२ शनिवार, दि. १२/११/२०२२ पाने ८ रु.३.००

## राज्यात ७ हजार ७५० ग्रामपंचायतींसाठी १८ डिसेंबरला मतदान

**मुंबई : शिंदे गटाच्या बंडानंतर राज्यातील सर्वात मोठी निवडणूक जाहीर झाली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांतील ७ हजार ७५० ग्रामपंचायतींच्या सदस्यपदांसह थेट सरपंचपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी १८ डिसेंबर २०२२ रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी संबंधित ठिकाणी आचारसंहिता लागू झाली असून २० डिसेंबर २०२२ रोजी मतमोजणी होईल, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त युपीएस मदान यांनी बुधवारी केली आहे.**

राज्य निवडणूक आयुक्त युपीएस मदान यांनी सांगितले की, ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर **पान नं.२ वर ...**

## सरकार रद्द करणार १० लाख शिधापत्रिका

**मुंबई : देशभरातील कोट्यावधी लोक मोफत सरकारी रेशनचा लाभ घेत आहेत. पण आता सरकार चुकीच्या मार्गानं रेशन मिळवणाऱ्या लोकांचं रेशन बंद करणार आहे. सरकारनं अलीकडेच देशभरातून १० लाख बनावट शिधापत्रिका ओळखल्या आहेत. या शिधापत्रिका लवकरच रद्द करून त्यांच्या रेशनवर पूर्णपणे बंदी घालण्यात येणार आहे. ज्यांची शिधापत्रिका बनावट असल्याचं आढळून आले, त्यांच्याकडून सरकार रेशनची वसूलीही करणार आहे.**

वास्तविक, देशभरातील ८० कोटींहून अधिक लोक मोफत रेशन कार्डचा लाभ घेत आहेत. पण ही सुविधा घेण्यास पात्र नसलेले करोडो लोक देशात आहेत. असं असतानाही ते वर्षानुवर्षे मोफत रेशन सुविधेचा लाभ घेत आहेत. अलीकडेच सरकारनं १० लाख अपात्र **पान नं.२ वर ...**

**हॉल भाड्याने मिळेल**

**ग्रामपंचायतीचा प्रशस्त हॉल २५० खुर्चा, साऊंड सिस्टीम, लाईट व पाण्याच्या सोईसह माफक दरात भाड्याने उपलब्ध आहे**

**ग्रामपंचायत पाटपन्हाळे ता.गुहागर**

**मोबा. ९४२११३७२९२, ९८२२८९७३३६**

## दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालय! महाराष्ट्र देशातील पहिलं राज्य

**मुंबई : राज्यात आता दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन होणार असून मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे यांनी त्याला मंजुरी दिली असल्याची माहिती आमदार बच्चू कडू यांनी दिली आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरलंय.**

दिव्यांगांसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन व्हावं, म्हणून आमदार बच्चू कडू अनेक वर्षांपासून संघर्ष करीत आहेत. अखेर त्यांच्या लढ्याला यश आले. मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदेंनी त्यासंदर्भात मान्यता दिल्याची माहिती बच्चू कडूंनी दिली. त्यानंतर बच्चू कडू यांनी मंत्रालयाच्या प्रवेशद्वाराजवळ लाडू वाटून निर्णयाचे स्वागत केले.

राज्य सरकारच्या या निर्णयावर बोलताना आमदार बच्चू कडू म्हणाले की, या संबंधित बुधवारी बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. दिव्यांगांच्या हक्कांसाठी आम्ही गेली २५ ते २६ वर्षे लढा देतोय, त्याला आता यश आलं आहे. जागतिक अपंग दिनी म्हणजे ३ डिसेंबर रोजी याची घोषणा करण्यात येणार आहे. त्यामाध्यमातून दिव्यांगांसाठी स्वाधार योजना, गाडगेबाबा घरकुल योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच मूकबधिरांसाठी खाजगी क्षेत्रात काम मिळावं, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. येत्या १५ दिवसांत हे शासन मंत्रालय स्थापन करणार असून दिव्यांग मंत्रालय हा देशपातळीवरील मोठा निर्णय आहे.

### कसं असणार राज्याचे दिव्यांग मंत्रालय?

- **दिव्यांगांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हा पातळीवर दिव्यांग भवन आणि पुनर्वसन केंद्र असणार**
- **या विभागाला स्वतंत्र सचिव आणि प्रशासकीय यंत्रणा असणार**
- **या विभागासाठी जवळपास ६०० कर्मचाऱ्यांचा स्टाफ प्रस्तावित आहे. त्याचा खर्च ४७ कोटी रुपये असणार आहे.**
- **दिव्यांगाना सुविधा एकाच कार्डवर देण्यासाठी नियोजन असणार**
- **सरकारी आणि खाजगी नोकऱ्यांमध्ये दिव्यांगांच्या आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी केली जाणार**
- **या कर्मचाऱ्यांना वेतनासाठी आणि इतर खर्चासाठी ४८ कोटी खर्च अपेक्षित आहे.**
- **राज्यात जवळपास अडीच कोटी दिव्यांग बांधव आहेत, त्यांना याचा लाभ होणार**

## सुप्रिम कोर्टाचा ऐतिहासिक निर्णय

### आर्थिक निकषावरील EWS आरक्षणावर शिक्कामोर्तब

**नवी दिल्ली : २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने आर्थिक दुर्बल घटकांना नोकरी आणि प्रवेशांसाठी आर्थिक निकषावर देऊ केलेले १० टक्के आरक्षण सुप्रिम कोर्टाने वैध ठरवले आहे. १०३ व्या घटना दुरूस्तीच्या माध्यमातून ही करण्यात आलेली आरक्षणाची तरतूद वैध असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. विशेष म्हणजे ५ न्यायमूर्तींच्या घटनापीठाने बहुमताने हा निर्णय दिला आहे. सरन्यायाधीश उदय लळीत यांनी स्वत: विरोधात मत नोंदवले आहे. ५ पैकी ३ न्यायमूर्तींनी हे आरक्षण वैध ठरवल्याने त्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**

पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने हा ऐतिहासिक निकाल दिला आहे. सरन्यायाधीश उदय लळीत यांच्या अध्यक्षतेखाली घटनापीठाने हा निकाल दिला आहे. केंद्र सरकारने १०३ वी घटनादुरूस्ती करून सवर्ग प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या मागास घटकांना आरक्षणाची तरतूद केली होती. पाच न्यायमूर्तींपैकी तीन न्यायमूर्तींची सहमती होती तर दोन न्यायमूर्ती असहमत होते. सुप्रीम कोर्टाच्या या निकालामुळं देशभरात आर्थिक आरक्षण लागू करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

**१० टक्के आरक्षण**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना समाजात सन्मानाने जगता यावे आणि त्यांना शिक्षण आणि नोकरीची संधी प्राप्त व्हावी, यासाठी या घटकाला १० टक्के आरक्षण देण्यासाठी केंद्र सरकारने आरक्षणाची तरतूद केली होती. त्यानंतर देशात आर्थिकदृष्ट्या मागासांनादेखील आरक्षण देण्याची मागणी करण्यात येत होती. मात्र, केंद्र सरकारच्या या निर्णयाविरोधात जवळपास ४० याचिका दाखल करण्यात आल्या होत्या.

**आरक्षण कायम**

सरन्यायाधीश उदय **पान नं.२ वर ...**

... पान नं.१ वरुन

## राज्यात ७ हजार ७५० ग्रामपंचायतींसाठी १८ डिसेंबरला मतदान

२०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या तसेच नव्याने स्थापित या सर्व ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी १८ नोव्हेंबर २०२२ रोजी संबंधित तहसिलदार निवडणुकीची नोटीस प्रसिद्ध करतील. नामनिर्देशनपत्र २८ नोव्हेंबर २०२२ ते २ डिसेंबर २०२२ या कालावधीत दाखल करण्यात येतील. नामनिर्देशनपत्रांची छाननी ५ डिसेंबर २०२२ रोजी होईल. नामनिर्देशनपत्र मागे घेण्याची अंतिम मुदत ७ डिसेंबर २०२२ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत असेल व त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचे वाटप होईल. मतदान १८ डिसेंबर २०२२ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत होईल. नक्षलग्रस्त भागात दुपारी ३ वाजेपर्यंतच मतदानाची वेळ असेल. मतमोजणी २० डिसेंबर २०२२ रोजी होईल.

विविध जिल्ह्यांत निवडणूक होणाऱ्या ग्रामपंचायतींची जिल्हा व तालुकानिहाय संख्या : अहमदनगर- २०३, अकोला- २६६, अमरावती- २५७, औरंगाबाद- २१९, बीड- ७०४, भंडारा- ३६३, बुलडाणा- २७९, चंद्रपूर- ५९, धुळे-१२८, गडचिरोली-२७, गोंदिया- ३४८, हिंगोली-६२, जळगाव- १४०, जालना- २६६, कोल्हापूर-४७५, लातूर-३५१, नागपूर-२३७, नंदुरबार-१२३, उस्मानाबाद-१६६, पालघर-६३, परभणी-१२८, पुणे-२२१, रायगड-२४०, रत्नागिरी-२२२, सांगली-४५२, सातारा-३१९, सिंधुदुर्ग-३२५, सोलापूर-१८९, ठाणे-४२, वर्धा-११३, वाशीम-२८७, यवतमाळ-१००, नांदेड-१८१ व नाशिक-१९६.

## सरकार रद्द करणार १० लाख शिधापत्रिका

शिधापत्रिकाधारकांची ओळख पटवली आहे. ज्यांना यापुढे गहू, हरभरा आणि तांदूळ मोफत मिळणार आहे.

अपात्र शिधापत्रिकाधारकांची यादी शिधावाटप विक्रेत्यांना पाठवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. रेशन विक्रेते नावे चिन्हांकित करतील आणि अशा कार्डधारकांचा अहवाल जिल्हा मुख्यालयाला पाठवतील. त्यानंतर त्यांची कार्डे रद्द केली जातील. जे लोक मोफत रेशन मिळण्यास पात्र आहेत. त्यांनाच रेशन मिळेल.

जे कार्डधारक आयकर भरतात. याशिवाय ज्यांच्याकडे १० एकरापेक्षा जास्त जमीन आहे. अशा लोकांची यादीही तयार केली जात आहे. त्याचबरोबर अशा लोकांचाही शिधापत्रिका रद्द करणाऱ्यांमध्ये समावेश आहे. ज्यांनी गेल्या ४ महिन्यात मोफत रेशन घेतलेले नाही. त्याचबरोबर काही लोक असे आहेत जे मोफत रेशनचा व्यवसाय करतात. अशा लोकांचीही सरकारकडे यादी आहे. बनावट मार्गाने शिधापत्रिका वापरणाऱ्यांची सर्वाधिक संख्या यूपीमध्ये समोर आली आहे. मात्र, तरीही शिधापत्रिकाधारकांची पात्रता तपासण्याचे काम सुरू आहे.

## सुप्रिम कोर्टाचा ऐतिहासिक निर्णय

लळीत यांनी सरन्यायाधीशपदाची धुरा हाती घेतल्यानंतर या प्रकरणावर तातडीने घटनापीठासमोर सुनावणी घेतली होती. उदय लळीत यांच्या कामकामाचा आज शेवटचा दिवसही होता. त्यामुळं आरक्षणाच्या निकालाकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले होते. सर्वोच्च न्यायालयाने आर्थिक दुर्बल घटकांचे १० टक्के आरक्षण कायम राखण्याचा निकाल दिला आहे. सरन्यायाधीश उदय लळीत, न्यायमूर्ती दिनेश माहेश्वरी, न्यायमूर्ती रविंद्र भट्ट, न्यायामूर्ती बेला एम त्रिवेदी आणि जेबी पारदीवाला यांच्या घटनापीठाने आरक्षणावर निकाल सुनावला आहे. चारही न्यायमूर्तीपैकी तीघांनी निकाल आरक्षणाच्या बाजून दिला आहे तर सरन्यायाधीश उदय लळित यांच्यासह न्यायमूर्ती रवींद्र भट यांनी आर्थिक आरक्षणाच्या तरतुदीला विरोध केला आहे.

# कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांच्या वक्तव्याचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी गुहागरतर्फे निषेध




**गुहागर (प्रतिनिधी) महाराष्ट्र सरकारमधील कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी खासदार सुप्रियाताई सुळे यांच्याबद्दल शिवराळ भाषेत काढलेल्या उद्गारांचा राज्यभर निषेध व्यक्त करण्यात येत आहे. अब्दुल सत्तार यांचा राजीनामा तातडीने घेण्याच्या मागणी करता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी गुहागरतर्फे जोरदार निषेध करण्यात आला. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, या मागणीचे निवेदन गुहागर पोलीस निरीक्षक तुषार पाचपुते यांना देण्यात आले. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मंत्री अब्दुल सत्तार यांची हकालपट्टी करावी, अशीही मागणी करण्यात आली.**

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे गुहागर शहराध्यक्ष श्री.मंदार कचरेकर, नगराध्यक्ष श्री.राजेश बेंडल, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष श्री.पद्माकर आरेकर, महिला आघाडी तालुकाध्यक्ष सौ.स्नेहा भागडे, महिला शहराध्यक्ष सौ.सुजाताताई बागकर, सेक्रेटरी श्री.प्रदीप बेंडल, श्री.मयुरेश कचरेकर, रविंद्र बागकर, हर्ष बागकर, स्वाती कचरेकर, मनाली मोरे, निलीमा बागकर, रत्नाकर बागकर, विजया पावसकर, विद्यार्थी शहराध्यक्ष श्री.सौरभ भागडे, सौ.सिद्धी आरेकर त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसचे शहरातील कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# महिलांच्या औषधांसाठी २ कोटींचा निधी

**रत्नागिरी : राज्यातील 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' या विशेष मोहिमेत महिलांना तपासणीसाठी नेण्याकरिता, औषधांसाठी प्रतिजिल्हा दोन कोटी रुपये निधी देण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे रत्नागिरी जिल्ह्यासाठीही दोन कोटींचा निधी उपलब्ध होणार आहे.**

जिल्ह्यात नवरात्री उत्सवापासून 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' या अभियानास सुरूवात झाली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अनिरुद्ध आठल्ये, जिल्हा शल्यचिकित्सव डॉ.संघमित्रा फुले यांच्या मार्गदर्शनात आरोग्य विभाग हे अभियान राबविले जात आहे. या अभियानास जिल्हाभरातून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

या मोहिमेत राज्यातील अंदाजे ४ कोटी महिलांची आरोग्य तपासणी, औषधोपचार करण्यात येणार आहे. यामध्ये १८ वर्षांवरील महिला, माता, गरोदर स्त्रिया यांचा समावेश आहे. हा कार्यक्रम दि. १५ नोव्हेंबरपर्यंत सुरू असणार आहे. लाभार्थ्यांना तपासणीसाठी शिबिराच्या ठिकाणी आणणे व घरी पोहोचविणे यासाठी वाहतूक व्यवस्था केल्यास अभियान अधिक प्रभावीपणे राबविता येईल, हे लक्षात घेऊन वाहतुकीसाठी निधीची तरतूद करण्याचे ठरले.

स्थानिक स्तरावर औषधे उपलब्ध करून देण्याची वेगळ्या निधीची तरतूद नसल्याने हा निधी देखील जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक यांना उपलब्ध करून देण्याचे ठरले. त्यानुसार ग्रामीण भागासाठी वाहतूक, औषधांकरिता मिळून १ कोटी, शहरी, महापालिका क्षेत्रासाठी १ कोटी असे प्रत्येक जिल्ह्यासाठी २ कोटी रुपये निधी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

या मोहिमेदरम्यान वैद्यकीय अधिकारी, स्त्रीरोग तज्ज्ञांमार्फत १८ वर्षावरील महिला, नवविवाहीत महिला, गरोदर माता यांची तपासणी, औषधोपचार, सोनोग्राफी, समुपदेशन करण्यासाठी मेडिकल, डेंटल शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. या व्यतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी जास्तीत जास्त तज्ज्ञ तपासणीसाठी उपलब्ध होतील. यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' या मोहिमेला नवरात्री उत्सवापासून सुरूवात झाली आहे. आतापर्यंत ४ लाख ३८ हजार ७५० महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. सुरूवातीला या मोहिमेला चांगला प्रतिसाद मिळाला. मात्र गेले काही दिवस शेतीची कामे सुरू असल्याने ग्रामीण भागात ही मोहीम कासवगतीने सुरू आहेत.

# वरवेलीतील खडी क्रेशर व काळ्या दगडाच्या उत्खननला ग्रामस्थांचा विरोध; ग्रामसभेत उद्रेक





गुहागर (प्रतिनिधी) गुहागर तालुक्यातील ग्रामपंचायत वरवेलीच्या कार्यक्षेत्रात असलेल्या खडी क्रेशर व काळा दगड उत्खननामुळे त्रस्त ग्रामस्थांनी वरवेली ग्रामपंचायतीच्यावतीने खडी क्रेशरचे मालक श्री.दीपक पवार यांना ग्रामसभेच्या निर्णयानुसार सूचना पत्र क्रेशरस्थळी जाऊन देण्यात आले. या सूचना पत्रात म्हटले आहे की, वरवेली ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात खडी क्रेशर व काळा दगड उत्खनन मोठ्या प्रमाणात सुरूंग लावणे व दगड उत्खनन करून मोठ्या प्रमाणात वाहतूक करणे दिवस-रात्र चालू आहे. तरी मोठ्या प्रमाणात सुरूंग लावत असल्याने येथील ग्रामस्थांच्या घरांना दणका बसणे, विहीर/बोअरवेलचे पाणी झपाट्याने कमी होणे, फळबाग लागवड शेतकऱ्यांच्या आंबा, काजू व इतर लागवड यांच्यावर मोठ्या प्रमाणात धूळ बसत आहे. त्यामुळे येथील शेतकरी व ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. तरी याबाबत त्वरित खबरदारी न घेतल्यास विनाकारण ग्रामस्थांच्या तक्रारींना सामोरे जावे लागेल. तरी याबाबत त्वरित खबरदारी व शासनाच्या अटी व शर्तीचे पालन करण्यात यावे असे पत्र सरपंच पुनम रावणंग यांनी शुक्रवारी प्रकल्पस्थळी जाऊन दिले. त्यांच्यासोबत उपसरपंच धनश्री चांदोरकर, ग्रामपंचायत सदस्य चंद्रशेखर विचारे, गणेश रांजाणे, दिव्या किर्वे, गुंडा विचारे, दीपक विचारे, गणेश किर्वे, संदीप विचारे, वैभव पवार, संदीप पवार, सूरज गोरीवले आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



निवेदन सादर करताना ग्रामस्थ

### उत्तर देण्यास कंपनी असमर्थ

हरित लवादाने गोरगरीब चिरेखाणीवर अनेक नियमावली लादल्या. अनेक बंधने लावण्यात आली. परंतु एल.एन.टी. कंपनी उत्खनन करीत असलेल्या या काळ्या दगडाच्या खाणीवर कोणाचेही नियंत्रण नाही. रात्रंदिवस सुरू असलेल्या या काळ्या दगडाच्या खाणीला परवानगी कुणी दिली. यामध्ये कोणकोणत्या अटी लावण्यात आल्या आहेत. अनियमितपणे काळ्या दगडाची वाहतूक सुरू आहे. तसेच मोठ्या प्रमाणात जिलेटीनद्वारे ब्लास्टिंग सुरू आहे. याबाबतच्या परवानग्या कोणकोणत्या आहेत. हे जाणून घ्याण्याचे प्रयत्न अनेक जागृत नागरिक व वरवेली तसेच मळण ग्रामस्थांनी वेळोवेळी केले. परंतु कंपनी व ठेकेदाराच्या वतीने उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. याबाबत गौण खनिज विभाग आणि महसूल विभाग गप्प का असा प्रश्न सर्वसामान्य जनता विचारत आहे.

# रत्नागिरीमध्ये पक्षी संशोधन केंद्र सुरू करत आहे मोरांचा ठेपा - पक्षी संशोधक सूर्यकांत खंदारे

राजा म्हणजे अधिपती / भूपति, सर्वदूर भारतात अधिवास असलेला मोर हा सुद्धा पक्षी जंगलातला राजा. डोळ्याचं पार्ण फेडणार सुंदरता, रंगाची विलोभनीय घडण, रेशमी चमक असलेला मोर, जेव्हा लांडोरसाठी पिसारा फुलवून नाचतो तेव्हा पाहणाऱ्यास स्वर्ग अनुभूती होते. राष्ट्रीय पक्षी असलेला मोर रत्नागिरीत मोठ्या प्रमाणात आहे. मोराबद्दल बोलताना पक्षी संशोधक सूर्यकांत खंदारे सांगतात रत्नागिरी सोडलं तर महाराष्ट्रामध्ये प्रत्येक जिल्ह्यात मोरांचे रखवाले तयार झाले आहेत. मोरांचे अस्तित्व धोक्यात, मोरांच्या हत्या होत आहेत, मोरांना दानापाण्याची सोय, मोरांची आई, मोरांचा मित्र, मोराचं संगोपन केंद्र इत्यादी मथाळ्या खाली मोरांचे पालक मालक उत्पन्न होत आहेत. यापुढे जाऊन पक्षी संशोधक यांचा उल्लेख मानवी बुद्धी वापरून सर्वकाही आधीपात्याखाली आणण्याचे अघोरी स्वप्न असा करतात. स्वतंत्र निसर्गाचा आनंद घेण्यापेक्षा हे माझ्यामुळे आहे असे दर्शवण्यात या लोकांना जास्त आनंद होतो. या सर्व प्रकारस पक्षी संशोधक यांच्या मते एकच उत्तर असेल ते म्हणजे मोरांचा ठेपा, ठेपा म्हणजे आधार, ठरलेलं ठिकाण, जिथे मोरांना नैसर्गिक जीवनात जगताना पाहता येईल, त्यांना कुणीही तिथे गुलाम, पाळीव बनवणार किंवा त्यांचे मालक बनणार नाही, त्यांच्या नैसर्गिक जीवन जगण्याच्या क्षमतेवर प्रश्न चिन्ह उभा करून दानापानी करणार नाही. मोरांचा ठेपा जे मोरंच अस्तित्व किती स्वातंत्र्य मुक्तपणे जगात आहे आणि जैवविविधता कशा मानवी हस्ताक्षेपशिवाय समवृद्ध असते हे दर्शवेल.



आपला एकमेव आधुनिक पक्षी संशोधक
सूर्यकांत खंदारे

# माकडांच्या वाढत्या उपद्रवाने शेतकरी त्रस्त

संगलट (खेड) : कोकणातील खेड खाडीपट्टा विभागामध्ये संगलट परिसरामध्ये वानर व माकडांच्या वाढत्या उपद्रवामुळे दिवसेंदिवस शेती करण्याचे प्रमाण कितीतरीपटीने कमी होत चालले आहे.

कोकणातील ग्रामीण भागात भात, नाचणी, वरी, फळभाज्या, कुळीथ, उडीद या पिकांसाठी प्रसिद्ध आहे. परंतु वानर व माकडांमुळे शेतकऱ्याला शेती सोडावी लागत आहे. कोकणातील ग्रामीण भागातील चांगला मोबदला देणारी आंबा, काजू, पेरू, चिकू, केळी, रामफळ, नारळ, सुपारी या बागायतीमध्येसुद्धा मोठ्याप्रमाणात आक्रमण करून येथील शेतकऱ्याला हैराण करत आहेत. माकडांच्या त्रासाने येथील शेतकरी हतबल झाला आहे.

# राज्यस्तरीय रांगोळी स्पर्धेत राहुल कळंबटे यांचे सुयश

## २४ तासात साकारल्या कलाकृती समीर चांदरकर प्रथम

**रत्नागिरी : देवगड युथ फोरमतर्फे शेठ म.ग.हायस्कूलच्या गुरुदक्षिणा प्रेक्षागृहात आयोजित राज्यस्तरीय व्यक्तिचित्रे रांगोळी स्पर्धेत कट्टा मालवण येथील समीर चांदरकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. या स्पर्धेत द्वितीय क्रमांक कुडाळच्या केदार टेमकर यांना, तृतीय क्रमांक रत्नागिरी तालुक्यातील मालगुंड येथील कलाकार राहुल दत्ताराम कळंबटे यांनी पटकाविला. राहुल कळंबटे यांनी यापूर्वी विविध ठिकाणच्या राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये यश मिळवले असून याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.**

या स्पर्धेत गोवा राज्यासह महाराष्ट्रातून मुंबई, पुणे, सांगली, रत्नागिरी, सिंधुदुर्गमधील स्पर्धक सहभागी झाले होते. २४ तासात साकारल्या कलाकृती युथ फोरमच्यावतीने रांगोळी स्पर्धेचे हे दुसरे वर्ष होते. अत्यंत सुरेख पद्धतीने रांगोळी स्वरूपात साकारल्या होत्या. स्पर्धेत उत्तेजनार्थ साईनाथ पारकर (मालवण), किशोर पांचाळ (मुंबई), रमेश पाचाळ (मुंबई), सचिन अवसारे (सांगली) या स्पर्धकांना गौरविण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण कलानिकेतन महाविद्यालयाचे (कोल्हापूर) संचालक विजय टीपुगडे आणि कलानिकेतन महाविद्यालयाचे कला शिक्षक इंद्रजीत बंदसोडे यांनी केले. विजेत्यांना रोख बक्षिसे विजेत्या स्पर्धकांना अनुक्रमे रोख ११ हजार रुपये, ७ हजार रुपये, ५ हजार रुपये, प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. उत्तेजनार्थ क्रमांकांना प्रत्येकी एक हजार रुपये व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. बक्षीस वितरणप्रसंगी जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष सतीश सावंत, जिल्हा बँकेचे संचालक सुशांत नाईक, ॲड.अविनाश माणगावकर, नगराध्यक्षा साक्षी प्रभू, उपनगराध्यक्षा मिताली सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. कलावंत, कलाशिक्षक, संस्थांचा सन्मान युथ फोरमचे उपाध्यक्ष प्रणव नलावडे यांनी रांगोळी स्पर्धेचा मुख्य उद्देश आपल्या मनोगतातून सांगितला.

# महाराष्ट्र पोलीस बॉईजची शिर्डीच्या राज्यस्तरीय बैठकीसाठी जोरदार तयारी

**चिपळूण : महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेची संस्थापक अध्यक्ष राहुल दुबाले यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण प्रमुख सैफ सुर्वे यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच (खेर्डी, चिपळूण) येथे बैठक झाली. या बैठकीत संघटना वाढीसाठी महत्वपूर्ण चर्चा झाली. तसेच १३ नोव्हेंबर रोजी शिर्डी येथे होणाऱ्या संघटनेच्या राज्यस्तरीय बैठकीत नियोजन करण्यात आले.**

या बैठकीला खेर्डीतील युवकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. युवकांनी संघटनेत काम करण्याची इच्छा व्यक्त करीत आम्ही संघटनेसाठी काम करू व पोलिसांना सहकार्य करू अशी ग्वाही दिली. तसेच सैफ सुर्वे यांनी १३ नोव्हेंबर रोजी शिर्डीत संघटनेची पोलीस परिवार अस्तित्व राज्यस्तरीय बैठक होणार आहे. या बैठकीत पोलीस परिवार यांच्यासाठी शिक्षण, संरक्षण, रोजगार, आरोग्य आणि निवारा या पाच मुलभूत घटकांवर चर्चा होणार असल्याची सेफ सुर्वे यांनी सांगितले. यावेळी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे कोकण प्रमुख सैफ सुर्वे, रत्नागिरी जिल्हा अध्यक्ष समीर कदम, युवक आघाडी जिल्हाध्यक्ष आतिफ गोठे, गोरा कुंभार समाज विकास मंडळाचे तालुका अध्यक्ष प्रकाश साळवी, युवा आघाडी उपाध्यक्ष दिनेश गुडेकर आदी, दिनेश व्हाळकर, शेखर खांबे आदी उपस्थित होते.

# गुहागरमधील नाट्य कलाकारांनी केले रंगभूमी पूजन

**गुहागर (प्रतिनिधी) मराठी रंगभूमी दिनानिमित्त शहरातील नाट्यकलाकारांनी विठ्ठल गोपाळ रंगमंचाचे पूजन करून रंगभूमीला अभिवादन केले. त्यानंतर सर्वांनी सामुहिक नोंदी म्हणून मराठी रंगभूमीसाठी झटणाऱ्या सर्वांना मानवंदना दिली. यावेळी श्रीदेव कोपरी नारायण प्रासादिक नाट्यमंडळ व कला विकास संस्था गुहागरचे कलाकार उपस्थित होते.**

गुहागर शहरातील सर्वात जुना रंगमंच म्हणजे वरचापाट येथील श्री देव कोपरी नारायण मंदिराशेजारी असलेला रंगमंच, मराठी रंगभुमीवरील अनेक संगीत नाटकांना स्वरांकित करणारे पं.गोविंदराव पटवर्धन यांनी या रंगमंचावर अनेक वर्ष संगीत नाटकांना साथ संगत केली. रंगभूमीसाठी आयुष्य वेचलेल्या पं.गोविंदराव पटवर्धन यांनी वडिलांच्या स्मरणार्थ या रंगमंचाचा १९७७ मध्ये जीर्णोध्दार केला. ग्रामस्थांनी या रंगमंचाचे नामकरण विठ्ठल गोपाळ तथा अण्णा पटवर्धन असे केले. या रंगभूमीवर स्वातंत्र्यपूर्व काळापासून नाटकांचे सादरीकरण केले जाते. या नाटकांमध्ये काम करणाऱ्या अनेक मंडळींनी येथे नटेश्वराच्या जागृतावस्थेचा अनुभव घेतला आहे.

मराठी रंगभुमी दिनाच्या निमित्ताने शनिवारी (ता.५) रात्री कोपरी नारायण प्रासादिक नाट्यमंडळ, कलाविकास संस्था गुहागर या संस्थाचे कलाकार, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ विठ्ठल गोपाळ पटवर्धन रंगमंचावर जमले. प्रातिनिधीक स्वरूपात अनेक वर्षे या रंगभूमीवर काम करणाऱ्या सौ.अनुराधा दामले, नेपथ्यामध्ये महत्वाची भूमिका निभावणारे संजय सावरकर व रवींद्र दामले, राज्य नाट्य स्पर्धेत अभिनयाचे पारितोषिक मिळवणारे कृपाल परचुरे, विविध नाटकांमध्ये काम करणारे संदीप वैद्य, मनिष खरे, संगीत नाटकांमध्ये गायकांची तयारी करून घेणारे अरुण परचुरे यांनी रंगभूमीचे पूजन केले. यावेळी वेदमूर्ती मंदार दिक्षित यांनी वेदांमधील पंचमहाभुतांचे स्मरण व स्तुती करणाऱ्या श्लोकांचे पठण केले. त्यानंतर श्री देव कोपरी नारायण मंदिरामध्ये ऑर्गन आणि तबल्याच्या साथीवर सर्वांनी सामुहिक पंचतुंड नररुंड मालधर ही नांदी गाऊन मराठी रंगभूमीला मानवंदना दिली.

यावेळी श्री देव कोपरी नारायण देवस्थानचे अध्यक्ष व नगरसेवक समीर घाणेकर, ट्रस्टी महेश दीक्षित, अनिल वैद्य, अमित जोशी, अद्वैत गोखले, चिन्मय सावरकर, प्रकाश तांबे, राधाकृष्ण आरती मंडळाचे सदस्य, माजी सरपंच सौ.विद्या परचुरे यांच्यासह महिला पुरुष, बालकलाकार आदी उपस्थित होते.

# दाभोळमध्ये १२ व १३ नोव्हेंबरला एन.डी.एस.महोत्सवाचे आयोजन महिलांसाठी विविध स्पर्धा

**दाभोळ (स्वप्नील घटे) येथील एन.डी.एस.ग्रुपचे सन २०२२ साल हे रौप्य महोत्सवी वर्ष असल्याने दोन दिवस दि. १२ व दि.१३ नोव्हेंबर रोजी महिलांसाठी विविध स्पर्धा व तालुकास्तरीय खालूबाजा स्पर्धा आयोजित करून एन.डी.एस महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे.**

या निमित्त दि. १२ नोव्हेंबर २०२२ रोजी रंगावली स्पर्धा व प्रदर्शन, पाककृती स्पर्धा व प्रदर्शन, पाककृती स्पर्धा, इ.८ वी ते इ.१२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी मी दाभोळ बोलतोय या विषयावर निबंध लेखन स्पर्धा, रस्सीखेच स्पर्धा, मनोरंजनासाठी गरबानृत्य आणि दुपारी २.३० वाजता व्यवसाय व मार्केटींग या विषयावर महिला बचतगट वर्गाकरीता मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार दि. १३ नोव्हेंबर रोजी दुपारी २.३० वाजता दाभोळमध्ये प्रथमच तालुकास्तरीय खालूबाजा स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तर सायंकाळी ५.३० वाजता (निमंत्रित मान्यवरांचा सन्मान सोहळा आणि स्पर्धेतील विजेत्यांच्या पारितोषिक वितरण समारंभ करून या महोत्सवाची सांगता होणार आहे.

वरील महोत्सव वरच्या विभागातील कै.भाई नरवणकर सभागृह दत्तमंदिर येथे होणार असून स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांनी अमित देवळेकर ९९७००७३९७५, निलेश पदुकले ९९६०६५९४७१, स्वप्नील घटे ८९७५०१०२२३ यांच्याकडे नाव नोंदणी करावी. या महोत्सवाला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थिती दर्शवून महोत्सवी वर्ष कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# गुहागरातील पंचवीस वर्षीय ऋतुराज पावसकर नापता

गुहागर (प्रतिनिधी) मुळचा गुहागर तालुक्यातील वेळणेश्वर येथील रहिवासी व कामानिमित्त रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील करंजा येथे बोटीवर खलाशी म्हणून काम करणारा २५ वर्षीय ऋतुराज काशिनाथ पावसकर हा तरुण २९ ऑक्टोबर पासून करंजा इथूनच नापता झाला आहे. याबाबतची नोंद उरण पोलीस ठाणे येथे करण्यात आले असून अद्याप मिळून आलेला नाही. नापता असलेला ऋतुराज काशिनाथ पावस्कर हा मूकबधिर आहे. सदर तरुण करंजा येथील विलास कोळी यांच्या बोटीवर खलाशी म्हणून काम करत होता. २९ ऑक्टोबर रोजी पहाटे पाच वाजता तो करंजा गावातूनच निघून गेला असून नापता असल्याचे फिर्याद बोटीवरील तांडेल तुषार पालशेतकर यांनी उरण पोलीस ठाण्यामध्ये दिली आहे. सदर तरुण कोठे मिळून आल्यास ९३२६७०५९६०, ८८७९२९६०३०, ७३५०६८६९५१ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा, असे आवाहन वेळणेश्वर ग्रामपंचायतीचे सरपंच चैतन्य धोपावकर यांनी केले आहे.



# वर्षभरात रत्नागिरी जिल्ह्यात ३ बालविवाह बालहक्क संरक्षण आयोगाने घेतली दखल

**रत्नागिरी : पोक्सोसारख्या गुन्ह्यात मेडिकल तपासणी वेळेत होत नसल्याचा ठपका महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने ठेवला असून वर्षभरात ३ बालविवाह झाल्याचे गुन्हे जिल्ह्यात दाखल झाल्याची माहिती महाराष्ट्र बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य चैतन्य पुरंदरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे सदस्य सोमवारी रत्नागिरी दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी निरीक्षण गृहात आढावा बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत कामगार विभाग, समाजकल्याण विभाग, पोलीस विभाग जिल्हा शासकीय रुग्णालय अशा विविध विभागातील बालहक्कासंदर्भात आढावा त्यांनी घेतला. या बैठकीत अनेक मुद्दे चर्चेला आले. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत पुरंदरे यांनी मेडिकल रिपोर्टबाबत नाराजी व्यक्त केली.

वैद्यकीय अहवालात त्रुटी

यावेळी बोलताना पुरंदरे यांनी सांगितले की, पोक्सोसारख्या गुन्ह्यामध्ये वैद्यकीय अहवाल हा महत्त्वाचा असतो. या अहवालावरच गुन्हा दाखल होतो. मात्र रत्नागिरीत या अहवालात त्रुटी असल्याचा ठपका त्यांनी यावेळी ठेवला.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, दापोलीत एखादा गुन्हा दाखल झाला तर वैद्यकीय तपासणीसाठी रत्नागिरीत यावे लागते. त्यातच वाहन मिळेल की नाही? ही देखील शंका असते. पोक्सोसारख्या गुन्ह्यात वैद्यकीय तपासणीची सुविधा प्रत्येक तालुक्यात असायलाच हवी, असे ते म्हणाले.

कायद्यात प्रशिक्षणाची गरज

पोक्सोच्या गुन्ह्यात शिक्षेचे प्रमाण किती आहे? असा प्रश्न त्यांना केला असता ते म्हणाले की, पोक्सोसारखे गुन्हे दाखल करताना अभ्यासू पोलीस कर्मचारी असायला हवेत. तसेच या पोलिसांना अशा कायद्याचे प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. जिल्हास्तरावर कायद्याची विविध प्रशिक्षण शिबिरे होणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

बालविवाहाचे ३ गुन्हे

बालहक्क संरक्षण आयोगामार्फत आढावा घ्यायला आलेल्या पुरंदरे यांनी जिल्ह्यात वर्षभरात ३ बालविवाह झाल्याची माहिती दिली. तसेच या प्रकरणात ३ गुन्हे दाखल झाले असल्याचे पुरंदरे यांनी यावेळी सांगितले.

धाडसत्र सुरू

बालकामगार याबाबत माहिती विचारले असता ते म्हणाले की, बालकामगारांबाबत जिल्ह्यात चिंताजनक परिस्थिती अजिबात नाही. कामगार विभागाकडून याबाबत जिल्हाभरात धाडसत्र सुरू आहे.एमआयडीसी परिसर, बाजारपेठा, हॉटेल्स, मॉल आदी ठिकाणी बालकामगार आहेत का? याची तपासणी संबंधित विभागाकडून वेळोवेळी केली जात असल्याचे त्यांनी सांगितले.

चौकशी होणार

या दौऱ्यात काही संस्थाबाबत तक्रारी करण्यात आल्या. ज्या संस्था या आयोगाच्या अधिपत्याखाली येतात त्या संस्थांच्या कामाचा आढावा घेतला जाणार आहे. तसेच केवळ अनुदान घेऊन काम न करणाऱ्या संस्थांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यासंदर्भात उचित निर्णय घेतला जाईल, असे सुतोवाच पुरंदरे यांनी यावेळी केली.

# लोकसहभागातून उसगाव गावात ४ वनराई बंधारेचे काम पूर्ण



दाभोळ (स्वप्निल घटे) गेली कित्येक वर्ष गावाला भेडसावणारे पाणीटंचाईचे संकट लक्षात घेवून उसगाव ग्रामपंचायतीच्यावतीने कमी खर्चात लोकसहभागातून वनराई बंधारे बांधण्याची मोहीत हाती घेण्यात आली आहे. सरकारच्या वनराई बंधारा योजनेतंर्गत दापोलीतील उसगाव गावातील ४ वनराई बंधारे बांधण्यात आले आहेत. जमीन सिंचनाखाली व पाणी दैनंदिन वापरात आणण्यासाठी हे बंधारे बांधण्यात आले आहेत. या कार्यात गावातील जागरूक नागरिक, विद्यार्थी तसेच ग्रामपंचायतीने उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. यामध्ये गावचे सरपंच श्री.चेतन रामाणे, उपसरपंच श्रीमती ऐश्वर्या आग्रे, ग्रामसेवक श्री.दयानंद निंबाळकर, माजी उपसरपंच श्री.मिलिंद गोयथळे, यूएनडीपी प्रकल्प सहाय्यक श्री.हृषीकेश माळी व कृषी विभागाचे सहाय्यक कृषी अधिकारी श्री.शुभंकर यादव उपस्थित होते. या कामात गावातील ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. गावात अजूनही ३ ते ४ ठिकाणी बंधारे निर्माण करण्याचा मानस ग्रामपंचायतीचा असून यापुढेही उसगाव ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीला सहकार्य करावे असे आवाहन सरपंच चेतन रामाणे यांनी केले आहे.

# जानवळे येथील जानवलकरवाडीत पारंपरिक तुळशी विवाह संपन्न



वरवेली (प्रतिनिधी) गुहागर तालुक्यातील जानवळे गावातील जानवळकरवाडीतील प्रत्येक घरात पारंपारिक तुळशी विवाह समारंभ उत्साहात संपन्न झाला. पारंपारिक तुळशी विवाह समारंभाची सुरूवात वाडीचे मानकरी अंकुश जानवळकर यांच्या निवासस्थानापासून करण्यात आली. वाडीतील प्रत्येक घरातील तुळशी विवाह सोहळ्यासाठी विनोद जानवळकर, नथुराम जानवळकर, विजय जानवळकर, अंकुश जानवळकर, विश्वनाथ जानवळकर, दिनेश जानवळकर, संतोष जानवळकर आदींसह वाडीतील जानवळकर कुटंबिय उपस्थित होते.

# कलगीतुरा समाज उन्नती मंडळाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी उदय दणदणे

**गुहागर (प्रतिनिधी) सामाजिक, शैक्षणिक, कलाक्षेत्रात, विविध संस्थेवर कार्यरत असणारे गुहागर तालुक्यातील निवोशी गावचे सुपुत्र निर्भीड वृत्तपत्र लेखक तसेच पत्रकार उदय गणपत दणदणे यांची शनिवार ५ नोव्हेंबर २०२२ रोजी मराठी रंगभूमी या सुवर्णदिनी ५० वर्ष अधिक काळ कार्यरत असलेली लोककला व लोककलावंतांच्या पाठिशी खंबीरपणे उभी असणारी कोकणातील अग्रगण्य मातृसंस्था 'कलगीतुरा समाज उन्नती मंडळ मुंबई-महाराष्ट्र राज्य' संस्थेच्या 'प्रसिद्धी प्रमुख' पदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्याबद्दल पत्रकार उदय दणदणे यांनी सदर संस्थेचे सरचिटणीस संतोष धारशे, अध्यक्ष अनंत तांबे, चिटणीस सुधाकर मास्कर, खनिजदार सत्यवान यादव व सर्व सभासद, सदस्य यांचे आभार मानले असून पत्रकारितेच्या माध्यमातून संस्थेला परिपूर्ण प्रसिद्धी न्याय देण्याचा माझ्या निश्चित प्रयत्न असेल असे आश्वासीत केले.**



उदय दणदणे हे गेली २० वर्ष सातत्याने विविध दैनिक वृत्तपत्र लेखनातून तसेच आपल्या पत्रकारतेच्या माध्यमातून समाजातील विविध समस्या व जनतेच्या व्यथा निर्भिडपणे मांडत असून प्रसंगी अनेक समस्या मार्गी लागल्या आहेत. कलाप्रेमी व्यक्तिमत्व असलेले उदय दणदणे यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून कोकणातील नमन व जाखडी लोककला यांचा प्रसार प्रचार होण्याबरोबरच लोककलावंताचाही बहुमान उंचावण्यासाठी समाजात त्यांचा आदरतीर्थ सन्मान व्हावा प्रत्येक कलाकाराची व कलाकारांच्या सेवेतून कोकणची लोककला समृद्ध व्हावी, प्रसिद्धी व्हावी यासाठी ते जास्तीत जास्त प्रयत्नशील असतात. गेली दोन-तीन वर्षांपासून कोकणातील नमन लोककला व लोककलावंत यांच्या न्याय हक्कासाठी उदयास आलेली नमन लोककला संस्था कार्यक्षेत्र अखंड भारत या संस्थेच्या प्रत्येक उपक्रमाची व कार्यसेवेची त्याचबरोबर कलावंतांच्या व्यथा आपल्या पत्रकारतेच्या माध्यमातून ठळकपणे मांडत आहेत. त्याची दखल कोकणातील लोकप्रतिनिधी यांना विधानसभेत मार्च २०२२ च्या अधिवेशनात घ्यावी लागली. आणि त्याचा तात्काळ पाठपुरावा करत नमन लोककला संस्थेचे अध्यक्ष रविंद्र मटकर, सचिव सुधाकर मास्कर यांच्या मार्गदर्शनाखाली कोकणातील लोकप्रतिनिधी यांच्याबरोबर भेटीगाठी घेऊन सकारात्मक चर्चा घडवून आणण्यासाठी नमन लोककला संस्था यशस्वी झाली याचे त्यांना अधिक समाधान होत आहे. उदय दणदणे यांना नुकतेच १ ऑक्टोबर २०२२ रोजी विनोबा भावे, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे चरणस्पर्श लाभलेली 'मुंबई सर्वोदय मंडळ' या ऐतिहासिक वास्तूत सरकार मान्यता प्राप्त मैत्री संस्था मुंबई (महाराष्ट्र राज्य) वतीने त्यांच्या सामाजिक पत्रकारिता सेवेची दखल घेत 'भारतीय संविधान सन्मान-२०२२ तसेच सामाजिक कार्यकर्ता व मानवी हक्क प्रशिक्षण प्रमाणपत्र मा.सारीखा पाटील (डीन-नायर हॉस्पिटल-मुंबई) व मा.स्वप्नील वाडेकर (लोकसत्ता पत्रकार-अध्यक्ष-नंदा फाउंडेशन) मैत्री संस्थेचे अध्यक्ष मा.सूरज भोईर, सचिव राजेश जाधव अशा मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र व गौरवचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे. अशा विविध पुरस्काराने सन्मानित होत वृत्तपत्र लेखक उदय दणदणे यांनी आपल्या कार्यसेवेची समाजात एक वेगळी ओळख निर्माण केली असून 'कलगीतुरा समाज उन्नती मंडळ मुंबई-महाराष्ट्र राज्य मातृसंस्थेच्या 'प्रसिद्धी प्रमुख पदी' वृत्तपत्रे लेखक उदय दणदणे यांची नियुक्ती झाल्याबद्दल कलाक्षेत्रात गुहागर तालुकासह सर्वस्तरातून अभिनंदन सह शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# रुग्णवाहिकेवरील कंत्राटी वाहनचालकाचा प्रश्न मार्गी लावणार : पालकमंत्री उदय सामंत

**रत्नागिरी : 'समान काम, समान वेतन' या न्याय्य तत्वानुसार कंत्राटी वाहनचालकांचे मूळ वेतन १९,९०० असून, ते वाहन चालकांना लागू करण्याबाबत राज्याच्या आरोग्यमंत्र्यांशी चर्चा करून ते मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे, असे आश्वासन जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या कंत्राटी वाहनचालकांना राज्याचे उद्योगमंत्री व पालकमंत्री उदय सामंत यांनी रत्नागिरीच्या भेटीत दिले.**

जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णवाहिकांवर ६७ कंत्राटी चालक म्हणून गेली १८ वर्षे अखंडित सेवा करीत आहेत. जिल्ह्यातील रुग्णवाहिकांवर नेमलेल्या या कत्राटी चालकांना ठेकेदाराकडून १३ हजार ४४८ रुपये इतके मानधन देण्यात येते. किमान वेतन कायद्यानुसार वेळोवेळी वाढ करण्यात येणाऱ्या भत्यानुसार चालकांना मानधन अदा करणे सेवा पुरवठादाराला बंधनकारक होते. मात्र, या चालकांना किमान वेतनतत्वानुसार मानधन अदा करण्यात येत नाही. किमान वेतनानुसार १९,९०० इतके मानधन मिळणे आवश्यक आहे.

मानधन कमी देण्यात येत असून, तेही वेळेवर मिळत नसल्याने कंत्राटी वाहनचालकांचे हाल सुरू आहेत. सणासुदीलाही त्यांना मानधन मिळत नसल्याने त्यांच्या कुटुंबीयांचे हाल होत आहेत.

याबाबत अनेकदा जिल्हा परिषदेच्या सभांमध्ये जोरदार चर्चाही झाल्या आहेत. शिवाय कंत्राटदारालाही तशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरीही त्यांना वेळेवर मानधन तर मिळतच नाही. शिवाय शासनाच्या किमान वेतनानुसार ते देणे आवश्यक आहे. याबाबत पालकमंत्री सामंत यांची वाहनचालकांनी भेट घेऊन आपल्या मागण्या मांडल्या.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणातर्फे कायदेविषयक जनजागृती सुरू

**रत्नागिरी : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्यावतीने कायदेविषयक जनजागृती सुरू झाली असून मंगळवारी जिल्हा वाहतूक शाखेच्यावतीने वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्यात आली. जिल्हा न्यायालय रत्नागिरी येथे हा कार्यक्रम संपन्न झाला.**

राष्ट्रीय, महाराष्ट्र राज्य व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्यावतीने कायदेविषयक जनजागृतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वाहतूक शाखेचा समावेश करण्यात आला होता. या शिबिरात जिल्हा वाहतूक शाखेतर्फे सर्व जिल्हा सत्र न्यायाधीश, न्यायालयातील वकील, नागरिक यांना वाहतुकीच्या नियमांबाबत तसेच नियमांचे पालन करणे याबाबत माहिती देण्यात आली. तसेच ई-चलन मशीन त्याचबरोबर विद्यार्थी वाहतूक यासह अल्पवयीन मुलांनी गाडी चालवू नये आणि इतर वाहतूकीचे सर्व नियम याबाबत जनजागृतीपर माहिती देण्यात आली.

हे मार्गदर्शन पोलीस अधिक्षक धनंजय कुलकर्णी यांच्या आदेशाने सहा. वाहतूक पोलीस निरीक्षक दत्ता शेळके, पोलीस अंमलदार मिलिंद चव्हाण, सुशिल कदम, संतोष भिसे आदींच्या उपस्थितीत पार पडले.

# आबलोली श्री सदस्यांकडून स्वच्छता मोहीत

**आबलोली (अमोल पवार) डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे शेकडो सदस्यांनी आबलोली परिसरात स्वच्छता मोहिम राबवली. डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त प्रतिष्ठानतर्फे महाराष्ट्रामध्ये रस्ते दत्तक स्वरूपात घेऊन त्यांची वर्षभर स्वच्छता करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. गुहागर तालुक्यातील आबलोली पोलीस चेकपोस्ट ते शिर असे ४ किलोमीटर अंतराचे रस्ते श्री सदस्यांकडून स्वच्छ करण्यात आले. पोलीस चेक पोस्ट परिसरात साफसफाई करण्यात आली. गोळा केलेला सर्व कचरा खाजगी वाहनातून एकत्र करून खत निर्मिती प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले. या मोहिमेत सुमारे सात टन ओला कचरा गोळा करण्यात आला. प्रत्येक महिन्याच्या एका रविवारी आबलोली येथे तसेच संपूर्ण तालुक्यात ही मोहीम राबविण्यात येणार आहे अशी माहिती श्री सदस्यांकडून देण्यात आली.**

# आजाराला कंटाळून तरुणीची आत्महत्या

## वेलदूरमध्ये रहात्या घरात घेतला गळफास

**गुहागर (प्रतिनिधी) प्रतिक्षा कुशा तांडेल (वय २३) रा.वेलदूर खारवीवाडीत या तरुणीने भाड्याने घेतलेल्या खोलीत गळफास लावून आत्महत्या केली. ही घटना रविवारी (ता.६) सायंकाळी ६ च्या सुमारात घडली. आत्महत्येपूर्वी लिहिलेल्या चिठ्ठीमध्ये आजाराला कंटाळून आत्महत्या करत असल्याचे प्रतिभाने लिहून ठेवले होते. तिच्या पश्चात आई व भाऊ असे कुटुंब आहे.**

प्रतिक्षा कुशा तांडेल वेलदूर खारवीवाडीत आपल्या मामाच्या शेजारी भाड्याची खोली घेवून रहात होती. ती अंजनवेल ग्रामपंचायतीमध्ये डाटा ऑपरेटर म्हणून काम करत असे. रविवारी (ता.६) सकाळी प्रतिक्षा मामाच्या घरी गेली होती. दुपारनंतर पुन्हा आपल्या खोलीवर आल्यावर तिथे खोलीचे दरवाजे व खिडक्या बंद करून ठेवल्या होत्या. सायंकाळी देखील प्रतिक्षाने दरवाजे खिडक्या उघडल्या नाहीत म्हणून शेजारी रहाणारी नंदीनी जांभारकर हीने प्रतिक्षाला हाका मारल्या. मात्र खोलीतून प्रत्युत्तर न आल्याने नंदीनीने वाडीतील ग्रामस्थांना सांगितले. ग्रामस्थांनी दरवाजा जोरात ढकलून उघडला. त्यावेळी खोलीतील लोखंडी वाश्याला जरीकाठाच्या साडीने गळफास लावलेल्या स्थितीत प्रतिक्षा दिसली. तातडीने ग्रामस्थांनी तिला खाली उतरवले. कांदा तोंडाला लावून शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला. मात्र तोपर्यंत प्रतिक्षाचा मृत्यू झाला होता.यासंदर्भात पोलीसांनी अधिक चौकशी व तपासणी केली तेव्हा ५ दिवसांपूर्वी प्रतिक्षा डॉक्टरांकडे जावून आल्याचे कळले. तसेच खोलीत सुमारे ९ हजार रुपयांची औषधे खरेदी केल्याचा कागदही सापडला. पंचनामा, श्‍वविच्छेदन आदी प्रक्रिया पार पाडल्यानंतर साखरीआगर येथे प्रतिक्षावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

# अंजनवेल येथील बालभारती पब्लिक स्कूलमध्ये 'ज्ञानमेळा' संपन्न




**वरवेली (प्रतिनिधी) गुहागर तालुक्यातील अंजनवेल आरजीपीपीएल येथील बालभारती पब्लिक स्कूलच्यावतीने प्रशालेचे मुख्याध्यापक सुरजीत चटर्जी यांच्या अध्यक्षतेखाली 'ज्ञानमेळा' संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी असीमकुमार सामंता, मुख्य कार्यकारी अधिकारी, आरजीपीपीएल रत्नागिरी, श्रीम.प्रतिभा वराळे, तहसिलदार गुहागर, श्री.संजयकुमार अग्रवाल, जनरल मॅनेजर, आरजीपीपीएल, श्री.डॉ.जॉन फिलीप, एजीएम एचआर, आरजीपीपीएल आणि श्रीम.लताजी जॉन त्याचबरोबर आदरणीय पालक यांची उपस्थिती लाभली. प्रमुख उपस्थितांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात आले. ज्ञानमेळ्याच्या सुरूवातीला गणेश वंदनेच्या उत्तम नृत्य आविष्काराने नववीच्या विद्यार्थीनींनी सर्वांचे स्वागत केले.**

त्यानंतर बालभारती पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक सुरजीत चटर्जी यांनी उपस्थित मान्यवरांचे फुलांचे रोपटे देऊन स्वागत केले. आपल्या भाषणातून त्यांनी प्रमुख अतिथींचे आभार मानले. यासमयी श्री.असीमकुमार सामंता, सी.ई.ओ.आरजीपीपीएल रत्नागिरी त्यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हणाले की, शाळेने या कार्यक्रमाला शास्त्रमेळा हे नाव देता ज्ञानमेळा हे नाव देऊन पाहुण्यांना, पालकांना आणि विद्यार्थ्यांना ज्ञानाचे ग्रहण करण्याची, ज्ञान मिळवण्याची संधी दिली. श्रीम.प्रतिभा वराळे, तहसिलदार म्हणाल्या की, ज्ञानमेळ्यामुळे आणि गटकार्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांना आपल्या कौशल्यानुरूप काम करता आले. एक नवा अनुभव घेता आला. तसेच शाळा विविध उपक्रम राबवत आहे. यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास गतीने होतो. प्रत्येक मुलाने आपले ध्येय निश्चित करून सचोटी, कठोर परिश्रम आणि शिस्तीवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे असे त्यांनी सांगितले. सृष्टीला प्रकाशित करणाऱ्या ज्ञानदिपाचे उद्घाटन श्री.असीमकुमार सामंता सर, सी.ई.ओ.आरजीपीपीएल रत्नागिरी यांनी केले.

प्री स्कूल-ऋतू, प्री प्रायमरी-सण व पहिलीच्या विद्यार्थ्यांनी प्राणीजीवन चितारले होते. दुसरी ते सहावीच्या विद्यार्थ्यांनी सामुदायिक मदतनीस, गणित क्रिया, तर सातवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी जीवशास्त्र, भौतिकशास्त्र व सामाजिकशास्त्र या विषयांवर आपापली मॉडेल्स तयार केली होती. विद्यार्थ्यांच्या एका गटाने बुद्धीला चालना देणाऱ्या खेळातून मनोरंजन केले. ज्ञानमेळ्यातून विद्यार्थ्यांना गटकार्यामध्ये स्वत:ची कौशल्ये वापरण्यासाठी संधी मिळाली. एकमेकांमध्ये विचारांची देवाणघेवाण करता आली. कार्यक्रमाअंती विद्यार्थ्यांच्या ज्ञानातही भर पडली. प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.सुरजीत चटर्जी यांनी सर्वांचे आभार मानले. हा ज्ञानमेळा यशस्वी होण्यासाठी प्रशालेचे मुख्याध्यापक, शास्त्र, गणित, कला व समाजशास्त्र शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# आबलोली पागडेवाडी अंगणवाडीत किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन

**आबलोली (अमोल पवार)** गुहागर तालुक्यातील अंगणवाडी आबलोली पागडेवाडी येथे आबलोली गाव कायक्षेत्रातील किशोरवयीन मुलींचा मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात किशार वयात होणारे शारीरिक बदल, आरोग्य, व्यक्तिगत स्वच्छता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच किशोरवयीन मुलींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. बेटी बचाव, बेटी पढाव या योजनेविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. अंगणवाडी सेविका सुनिता पवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमासाठी उपस्थित आरोग्य सहाय्यिका एस.एस.पाटणकर, आरोग्य सेविका नंदिनी कवडे यांनी किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन केले. किशोर वयात घ्यावयाची काळजी, याविषयी सजगता बाळगणे गरजेचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी अशा प्रवर्तक एस.एस.साळवी विशाखा कदम, मंजिरी भोसले, अंगणवाडी सेविका सुनिता पवार, प्रिया कदम, स्वाती पागडे, संजीवनी वैद्य, प्रीतीका वाडकर, शितल पेडणेकर आदी उपस्थित होते. यावेळी गरोदर मातांनाही मार्गदर्शन करण्यात आले. पात्र वयोगटातील लाभार्थ्यांना यावेळी धनुर्वात प्रतिबंधक लस टोचण्यात आली. या मेळाव्यासाठी आबलोली गावातील किशोरवयीन मुली, गरोदर माता, स्तनदा माता उपस्थित होत्या. अंगणवाडी सेविका प्रिया कदम यांनी उपस्थितांचे आभार मानले.



# केंद्र पुरस्कृत फ्लॅगशिप योजनांमध्ये जिल्हा अग्रेसर

**रत्नागिरी : जिल्हा केंद्र पुरस्कृत फ्लॅगशिप योजनेंतर्गत येणाऱ्या १३ योजनांमध्ये अग्रेसर आहे. या योजनांची प्रभावी अंमलबजावणी केली तर जिल्हा प्रथम क्रमांकावर येईल, असे मत पालकमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केले.**

जिल्ह्यातील या योजनांसंदर्भातील कामकाजाबद्दल त्यांनी अधिकाऱ्यांचे कौतुक करत समाधान व्यक्त केले. उद्योगमंत्री तथा रत्नागिरी जिल्ह्याचे पालकमंत्री सामंत यांनी जिल्हाधिकारी सभागृह येथे केंद्र पुरस्कृत फ्लॅगशिप योजना तसेच जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समितीची बैठक घेतली त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी एम देवेंदर सिंह, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकरण पुजार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.संघमित्रा फुले, प्रकल्प संचालक नंदिनी घाणेकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अनिरुद्ध आठल्ये आदी अधिकारी उपस्थित होते.

# गुहागर तालुक्याला स्वतंत्र अग्निशमन दलाचे वाहन द्या

## मनसे गुहागर संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांची पालकमंत्री उदय सामंत यांच्याकडे मागणी

**शृंगारतळी (प्रतिनिधी) गुहागर तालुका हा मागील काही काळात पर्यटनासंह बांधकाम आणि उद्योग क्षेत्रात दिवसागिक प्रगतीशील असून तालुक्यात गुहागर आणि शृंगारतळी शहरात होत असलेल्या भीषण आगीच्या दुर्घटना लक्षात घेऊन तालुक्यात आपत्ती काळात अग्निशामक दलाची स्वतंत्र व्यवस्था नसल्याने व्यापाऱ्यांसह नागरिकांचे होणारे नुकसान लक्षात घेता मनसेचे गुहागर तालुका संर्पक अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी पालकमंत्री उदय सामंत यांच्याकडे प्रत्यक्ष भेटून गुहागर तालुक्यासाठी अग्निशामक वाहनाची व्यवस्था तातडीने करावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे. याप्रसंगी गुहागर तालुका सहसंपर्क अध्यक्ष ॲड.संदीप आग्रे, समीर जोशी आदी उपस्थित होते.**



वाढत्या पर्यटनासह गुहागर तालुक्यात मोठ्या प्रमाणात इमारतींचे बांधकाम होत आहे. नुकतीच शृंगारतळी येथे गादी कारखान्याला भीषण आग लागून लाखो रुपयांचे नुकसान झाल होत. अग्निशमन दलाची गाडी तीन तासानंतर पोहेचल्यामुळे आगीवर नियंत्रण मिळवता आले नव्हते. अशा आपत्ती काळात आरजीपीपीएलच्या मदतीच्या प्रतिक्षेत नागरिकांना रहावे लागते त्यापेक्षा तालुक्याला स्वतंत्र अग्निशमन दलाच्या वाहनाची व्यवस्था व्हावी अशी आग्रही मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांची मुंबईतील शासकीय निवासस्थानी भेट घेऊन गुहागर वासियांच्यावतीने निवेदनाद्वारे मागणी केली आहे. गेले कित्येक महिने गुहागर मनसेचे संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी गुहागर तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच गोरगरीबांना मदत करून आपल्या कार्याचा सामाजिक वसा त्यांनी सिद्ध केला आहे. त्यांच्या मागणीवर लवकरात लवकर अग्निशमक वाहन उपलब्ध होईल अशी अपेक्षा गुहागरवासिय करीत आहेत.

## जिल्ह्यातील ३ लाख ३२ हजार घरांमध्ये राबविणार सांडपाणी, घनकचरा प्रकल्प

**रत्नागिरी : मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.किर्तीकुमार पुजार यांच्या मागदर्शनाखाली ३ लाख ३२ हजार १३९ घरांमध्ये सांडपाणी, घनकचरा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.**

जिल्हा परिषदेच्या पाणी, स्वच्छता मिशनने हे शिवधनुष्य उचचले आहे. स्वच्छता, आरोग्य चांगले राहावे यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक गावांमधील घरात हा प्रकल्प राबविला जाणार आहे. यासाठी व्यापक जनजागृती मोहीम सुरू करण्यात आली आहे. अनुदानावर प्रकल्पाचा लाभ सर्व कुटुंबांना मिळावा असे नियोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागात विखुरलेल्या वाड्यावस्त्यांमध्ये घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन करणे शक्य होत नाही. शहरांमधील नागरिकांचा ओढा वाढला असला तरी निवासाची सुयोग्य व्यवस्था नसल्याने अनेकजण शहराजनिकच्या गावांमध्ये वास्तव्याला आहेत. राज्य शासनाने संबंधितांना गावात राहूनच रोजगार मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. अनेकजण ग्रामीण भागात राहून रोजगार संधी उपलब्ध करण्यावर भर देण्याच्या विचारात आहेत. प्रत्येक वाडी, गावातील लोकांच्या आरोग्याचे नियोजन केले जाणार आहे. कचरा, सांडपाण्यामुळे आरोग्यावर विपरित परिणात होतो हे टाळण्यासाठी गावस्तरावर त्याचे नियोजन केले जात आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.किर्तीकुमार पुजार यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरावर बैठका सुरू आहेत. टप्प्याटप्प्याने सर्व संबंधितांना प्रकल्पाचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

## रत्नागिरी जिल्ह्यातील २२२ ग्रामपंचायतींच्या निवडणूका

**रत्नागिरी : ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२ दरम्यान मुदत संपलेल्या जिल्ह्यातील २२२ ग्रामपंचायतींच्या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. दि. १८ डिसेंबर रोजी मतदान व दि.२० डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. जिल्ह्यात पुन्हा एकदा शिवसेना ठाकरे गट व महाविकास आघाडी विरोधात बाळासाहेबांची शिवसेना आणि भाजप आमनेसामने उभी राहणार आहे.**

रत्नागिरी जिल्ह्यात २२२ ग्रामपंचायतींची धुळवड उडणार आहे. जिल्ह्यात मंडणगडमध्ये १४, दापोली ३०, खेड १०, चिपळूण ३१, गुहागर २१, संगमेश्वर ३५, रत्नागिरी २८, लांजा, १८ आणि राजापूरमधील ३० ग्रामपंचायतींचा समावेश आहे. जिल्ह्यातील २२२ ग्रामपंचायतींसाठी प्रत्येक तालुक्यात तहसीलदार १८ नोव्हेंबर रोजी निवडणुकीची नोटीस प्रसिध्द करणार आहेत. त्यानंतर २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत सकाळी ११ ते दु. ३ या वेळेत नामनिर्देशन पत्रे मागवली जाणार आहेत. नामनिर्देशनपत्रांची छाननी ५ डिसेंबर रोजी होणार आहे. दि. ७ रोजी नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी दु. ३ ची वेळ देण्यात आली असून त्यानंतर निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. यावेळी उमेदवारांना निवडणूक चिन्ह वाटप केले जाणार आहे. दि. १८ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० ते ५.३० यावेळेत मतदान होणार आहे. तर मतमोजणी २० डिसेंबर रोजी होणार असल्याचे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केले आहे.

## परशुराम घाट दहा दिवसानंतर बंद होणार?

### चौपदरीकरण कामाला गती येण्याची शक्यता राष्ट्रीय महामार्ग व ठेकेदार कंपनीकडून नियोजन

**चिपळूण : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील परशुराम घाटात गेल्या वर्षभरापासून चौपदरीकरणाचे काम सुरू आहे. पावसाळ्यात दरडी कोसळण्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव जवळपास महिनाभर घाटातील वाहतूक बंद ठेवण्यात आली होती. आता पाऊस थांबल्याने घाटातील चौपदरीकरणाचा भराव आणि रुंदीकरणाचे काम जलद गतीने व्हावे, यासाठी घाटातील वाहतूक पुन्हा काही दिवस बंद ठेवण्याचे नियोजन राष्ट्रीय महामार्ग विभाग व ठेकेदार कंपनीकडून केले जात आहे. येत्या दहा दिवसांत त्यासंदर्भातील अंतिम निर्णय होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**

## राज्य परिवहन महामंडळासाठी पाच हजार बसेस येणार

**मुंबई :** आता राज्य परिवहन मंडळासाठी ५१५० इलेक्ट्रिकल बसेस येणार आहेत. त्याचबरोबर ५००० डिझेल बसेसचे सीएनजीवर रुपांतर केले जाणार आहे. एशियन डेव्हलपमेंट बँक यासाठी राज्याला सहकार्य करणार आहे. एशियन डेव्हलपमेंट बँकेचे शिष्टमंडळ सध्या राज्याच्या दौऱ्यावर आहे. या शिष्टमंडळाने सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी भेटून चर्चा केली. एडीबी बँकेच्या शिष्टमंडळातील प्रतिनिधींनी सांगितले की, राज्यात नदी जोड प्रकल्प, वाया जाणारे पाणी दुष्काळी भागात वळविण्यासाठीचा प्रकल्प तसेच राज्य परिवहन मंडळासाठी ५१५० इलेक्ट्रीकल बसेस या प्रकल्पांसाठी सहकार्य करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक - श्री.निसार हमीदखान सरगुरो यांनी हे वृत्तपत्र आर.के.हाऊस, शृंगारतळी, ता.गुहागर, जि.रत्नागिरी.महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले.
मुख्य कार्यालय : शृंगारतळी, ता.गुहागर,जि.रत्नागिरी.महाराष्ट्र.टेलीफॅक्स नं.: (०२३५९)२४४०६९. सर्वच लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद फक्त गुहागर न्यायालयात.